पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १५

**सभावृत्तांत**

दिनांक - **१६/०४/२०१६** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शनिवार दिनांक **१६/०४/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.ताकवणे नंदा विकास - सभापती**
२. मा.आर.एस.कुमार
३. मा.पांढरकर निलेश शंकरराव
४. मा.भारती फरांदे
५. मा.पाडाळे निता विलास
६. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
७. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
८. मा.कुटे चारुशीला प्रभाकर

या शिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.जगताप – नगरसचिव, मा.काटकर – प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.४ कृष्णानगर येथील सन २०१४-१५ तसेच सन २०१५-१६ मधील अंदाजपत्रकातील विकास कामे आवश्यक ठिकाणी करणेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत – मा.सुरेश म्हेत्रे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले जयंती महोत्सवासाठी मंडप व्यवस्था करणेचे कामास सुधारीत मान्यता मिळणेबाबत - मा.सुरेश म्हेत्रे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) प्रभाग क्र.२३ व २४ मध्ये श्रध्दा गार्डन, गणेश बाग व इतर उद्यानांमध्ये स्थापत्य विषयक कामे करणे या कामाचे सुधारीत खर्चास मान्यता मिळणेबाबत – मा.निलेश पांढरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) मौजे पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र.३४७ खेळाचे मैदान या आरक्षणास सिमाभिंत बांधणे या कामांतर्गत पिंपळे गुरव येथील विविध स्थापत्य विषयक विकास कामे,

किरकोळ देखभाल व दुरुस्तीची कामे करणेबाबत - मा.निलेश पांढरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत - मा.नंदा ताकवणे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत - मा.सुरेश म्हेत्रे, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक १८/०३/२०१६ व ०१/०४/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १४)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ६५ विषय क्रमांक : १

दिनांक : १६/०४/२०१६

सुचक : मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा.सुरेश म्हेत्रे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव –

फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.४ कृष्णानगर येथील सन २०१४-१५ तसेच सन २०१५-१६ मधील अंदाजपत्रकातील विविध विकास कामे सन्मा.सदस्यांची सुचविलेप्रमाणे विविध ठिकाणे बदलून करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१६-१७ मधील विविध विकास कामे वेगवेगळया वाहिन्यांचे खोदकामामुळे आवश्यक ठिकाणी सुचविल्याप्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६६ विषय क्रमांक : २

दिनांक : १६/०४/२०१६

सुचक : मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा.सुरेश म्हेत्रे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव –

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले जयंती महोत्सवासाठी मंडपव्यवस्था करणेचे कामास मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये र.रु.१०,००,०००/- (अक्षरी र.रु.दहा लाख फक्त) मान्यता मिळालेली आहे. सदर कामासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त कामाची व्याप्ती वाढल्यामुळे एकूण अंदाजपत्रकीय र.रु.२३,५०,०००/- इतकी येत आहे. तरी सदर कामास लागणा-या सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.२३,५०,०००/-(अक्षरी र.रु.तेवीस लाख पन्नास हजार फक्त) यांस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६७ विषय क्रमांक : ३

दिनांक : १६/०४/२०१६

सुचक : मा.निलेश पांढरकर अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.निलेश पांढरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.२३ व २४ मध्ये श्रध्दा गार्डन, गणेश बाग उद्यानामध्ये गेटचे काम, तारफेन्सिंग व कंपाऊंड करण्याचे काम सध्या चालू असून कंपाऊंड वॉलला प्लास्टर करुन पेंटींग करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे आवश्यक आहे. सदर बाबींमुळे कामाचे खर्चात वाढ अपेक्षित आहे. विषयांकित कामाचे सुधारित र.रु.२५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६८ विषय क्रमांक : ४

दिनांक : १६/०४/२०१६

सुचक : मा.निलेश पांढरकर अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.निलेश पांढरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

मौजे पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र.३४७ खेळाचे मैदान या आरक्षणास सिमाभिंत बांधणे (निविदा क्र.५०/०२/२०१४-१५) चे कामाचे आदेश ठेकेदार मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन यांना दिनांक २४/०७/२०१५ रोजी देण्यात आलेले असून कामीच मुदत ०९ महिने म्हणजेच दि.२३/०४/२०१६ अखेर पर्यंत आहे. पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र.३४७ खेळाचे मैदान या आरक्षणाची काही जागा मनपाचे ताब्यात नसल्याने तेथील नागरिकांचा काम करणेस विरोध आहे. तसेच विषयांकित कामामधून प्रभागातील विविध स्थापत्य विषयक विकास कामे, किरकोळ दुरुस्ती व देखभालीची कामे करणेबाबत मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. त्यामुळे मौजे पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र.३४७ खेळाचे मैदान या आरक्षणास सिमाभिंत बांधणे या कामातून पिंपळे गुरव येथील स्थापत्य विषयक विकास कामे, किरकोळ दुरुस्ती व देखभालीची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६९ विषय क्रमांक : ५

दिनांक : १६/०४/२०१६

सुचक : मा.नंदा ताकवणे अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.नंदा ताकवणे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

निविदा क्र.२७/६-२०१४-१५ अन्वये निगडी गावठाण प्रभाग क्र.१३ मध्ये " प्रभाग क्र.१३ मधील मधुकर पवळे मैदान येथे विविध खेळांची मैदाने विकसित करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे " हे काम करुन घेणेत आले असून त्या अंतर्गत त्याच प्रभागातील मुस्लीम दफनभुमी, हिंदू स्मशानभुमी व इतर ठिकठिकाणी अत्यावश्यक तातडीची स्थापत्य विषयक कामे करुन घेणेत आलेली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७०                                        विषय क्रमांक : ६

दिनांक : १६/०४/२०१६

सुचक : मा.सुरेश म्हेत्रे                                   अनुमोदक : मा.नंदा ताकवणे

संदर्भ : मा.सुरेश म्हेत्रे, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव –

निगडी गावठाण प्रभाग क्र.१३ मध्ये १) निविदा क्र.४/६१-२०१४-१५ अन्वये " प्रभाग क्र.१३ मध्ये स्कीम क्र.९, १०, ११ आणि १२ मध्ये ठिकठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे ", २) निविदा क्र.४/१३-२०१४-१५ अन्वये " प्रभाग क्र.१३ मध्ये ठिकठिकाणी नविन फुटपाथ करणे व काही ठिकाणी फुटपाथची ऊंची वाढविणे ही दोन्ही कामे करणेत आलेली आहेत. सदरचे दोन्ही कामांमधून याच प्रभागातील स्कीम नं.१० येथील तात्पुरत्या स्वरुपातील विरंगुळा केंद्राचे काम करुन घेणेत आलेले आहे. तसेच इतर ठिकाणची याच प्रभागातील अत्यावश्यक तातडीची स्थापत्य विषयक कामे करुन घेणेत आलेली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **नंदा विकास ताकवणे** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२३६/२०१६
दिनांक : २५/०४/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.